# अनंत बजाज यांच्याकडे धुरा

नवी दिल्ली : टाटा समूह, विप्रो समूहानंतर आता बजाज समूहाने आपल्या व्यवसायाची धुरा पुढच्या पिढीच्या हाती सोपवली आहे. जागतिक पातळीवर सुमारेरे सहा अब्ज डॉलर्सची उलाढाल असलेल्या बजाज समूहाने बजाज इलेक्ट्रिकल्सच्या संयुक्त व्यवस्थापकीय संचालकपदाची जबाबदारी अनंत बजाज यांच्या हाती दिली आहे. अनंत बजाज यांच्या नव्या नियुक्तीची माहिती बुधवारी कंपनीकडून मुंबई शेअर बाजाराला देण्यात आली. फेब्रुवारी २००६ मध्ये ३५ वर्षीय्य अनंत बजाज यांनी बजाज इलेक्ट्रिकल्सच्या संचालक मंडळात सहभागी झाले आणि कार्यकारी संचालकपदाची जबाबदारी यशस्वीरीत्या सांभाळली होती. कंपनीचे सीएमडी शेखर बजाज यांचे पुत्र असलेले अनंत यांच्याकडे व्यवसायाचा कारभार सोपवला जाणार असल्याची चर्चा गेल्या अनेक दिवसांपासून उद्योग विश्वात होती. मात्र त्याबाबतची औपचारिक घोषणा होणे केवळ बाकी होते. त्यानुसार बुधवारी कंपनीने अधिकृतरीत्या अनंत बजाज यांच्या हाती संयुक्त व्यवस्थापकीय संचालकपदाची धुरा सोपवली. मुंबई शेअर बाजाराला दिलेल्या माहिती कंपनीच्या संचालक मंडळाच्या समितीने अनंत यांच्या पदोन्नतीचा प्रस्ताव मंजूर केला असून ते आपल्या पदाच्या कार्यभार १ एप्रिल २०१२पासून स्वीकारणार असल्याचे म्हटले आहे. दरम्यान, टाटा उद्योग समूहापासून विप्रो समूहाने देखील आपल्या व्यापाराचा कारभार तरुण पिढीच्या हाती दिला आहे. आता ही मालिका बजाज यांनी पुढे कायम ठेवली आहे.